# उपसंहार

## उपसंहार :-

रवींद्र शोभणे यांच्या ' वर्तमान ' आणि ' शहामृग ' या कथासंग्रहांचा अभ्यास करणे हा उद्देश आहे. मराठी कथा वाङ्मयातील तिचे वेगळेपण व वैशिष्ट्ये यांचा शोध घेण्याचा हेतूने प्रस्तुत अभ्यास केला रवींद्र शोभणे हे नव्वदच्या दशका मधील एक महत्त्वाचे आश्वासक लेखक आहेत. शोभणेंचे आता पर्यंत ' वर्तमान ', 'दाहीदिशा', 'शहामृग' व 'कथांजली ' (संपादित) कथासंग्रह प्रकाशित आहेत. त्यामध्ये 'शहामृग' या दिर्घ कथांचा संग्रह आहे व या कथासंग्रहाला म. सा. प. चा शंकर पाटील पुरस्कार विदर्भ साहित्य संघाचा वा. कृ. चोरघडे पुरस्कार, सा. वा. नाशिकचा डॉ. अ. वा. वर्टी पुरस्कार अशा पुरस्कारांनी सम्मानित केलेले आहे व वाचकवर्गाने सुध्दा या कथासंग्रहाला पसंत केलेले आहे. म्हणून या कथासंग्रहाला अभ्यास करायचे ठरविले. त्याच बरोबर ' वर्तमान ' हा कथासंग्रह शोभणे यांचा पहिला कथासंग्रह आहे व यातील कथा लघू असून त्यातले वेगळेपर वाचताना जाणवते. म्हणून 'शहामृग' बरोबर ' वर्तमान ' या कथासंग्रहाचाही अभ्यास करायचे ठरविले.

रवींद्र शोभणे यांचे ' वर्तमान ' आणि 'शहामृग' हे दोन्ही कथासंग्रह नव्वदनंतरचे आहेत व शोभणे हे समकालीन साहित्य लेखन करणाऱ्या लेखकांपैकी एक लेखक आहेत. त्यामुळे त्यांच्या कथासंग्रहातील कथांचे स्वरूप समकालीन असलेले दिसून येते. म्हणून प्रथम समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहणे गरजेचे वाटले व पहिल्या प्रकरणात समकालीन कथालेखनाचे स्वरूपाचा अभ्यास केला.

पहिल्या प्रकरणात समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहात असताना असे दिसून आले की कालखंडानुरूप साहित्य प्रवाह बदलत गेला. १८१८ पासून सुरु झालेला कालखंडाचा प्रवाह १९६० पर्यंत येवून पोहचला परंतु याच्या मधल्या काळात अर्वाचीन, आधुनिक समकालीन साहित्य निर्माण झाले १८१८ पासून कथा लिहिली जावून लागली व कथेची सुरवात हरिभाऊनी केली. १९४५ पासून समकालीन कथेची सुरवात झाली व १९६० नंतर खऱ्या अर्थाने कथा बहरली आणि कथेने नवे रूप धारण केले. कथा समकालीन जीवनाचे चित्रण करू लागली. कथेतील समकालीन जीवनाचे चित्रण करू लागली. कथेतील समकालीन जीवनाचे चित्रण ग्रामीण, नागर, दलित या तीन प्रवृत्ततीनुसार येवू लागले.

१९४५ पासून समकालीन कथा सुरू झाली तरी १९६० नंतरची कथा समकालीन मानली जाते. समकालीन ग्रामीण कथालेखनामध्ये माडगूळकर अग्रेसर होते तर कथा पुढे नेण्यामध्ये रा. रं. बोराडे, उध्दव शेळके, आनंद यादव हे कथाकार सहभागी झाले व समकालीन ग्रामीण जीवनातील वास्तववादी चित्रण चारूता सागर, सखा कलाल, महादेव मोरे सारख्या लेखकांनी केले.

समकालीन नागर कथा लेखन गंगाधर गाडगीळ, गोखले, भावे पासून सुरू झाले. त्यानंतर जी.ए.कुलकर्णी, चित्रे, जातेगावकर, डांगे, श्याम मनोहर, सारखे लेखक नव्या प्रेरणा व नवा कसदारपणा घेऊन लिहिताना दिसत आहेत व त्यांच्या वाङ्मयाने आज नव्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

समकालीन दलित कथालेखनाची सुरूवात आण्णाभाऊ साठेनी केली व नंतर ना. रा. शेंडे, बंधुमाधव, शंकरराव खरात यांनी कथा पुढे सरकवली. पण १९६० पासूनच दलित कथेला स्वतःचे स्थान मिळाले. बाबुराव बागूल यांनी दलितांच्या वास्तववादी जीवनांचे चित्रण केले. केशव मेश्रामांनी झोपडपट्टीच्या जीवनाचे चित्रण केले तर वामन होवाळ, अर्जुन, अमिताभ यांनी ग्रामीण भागातील दलिताचे अतिवास्तववादी चित्रण केले. तसेच अविनाश डोळस, योगिराज वाघमारे, माधव कोंडविलकर, अरुण कांबळे, सुधाकर गायकवाड सारख्या कथाकारांनीही दलितांच्या समकालीन जीवनाचा वेध घेणाऱ्या कथा लिहिल्या

समकालीन लेखिकांमध्ये कमल देसाई, तारा वनारसे, विजया राजाध्यक्ष यांनी स्त्रियांच्या दु:खाचे चित्रण केले. तर गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडूलकर, आशा बगेनी आधुनिक स्त्रीचे प्रश्न मांडले.

समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहिले तर कथेच्या तंत्रात, मांडणीत आणि आशयात बदल झालेला आहे हे दिसून येते. मुख्य म्हणजे मानवी अस्तित्व विषयक प्रश्न मांडण्याचा कथाकार प्रयत्न करत आहेत. तर स्त्रियांच्या आणि दलितांच्या अनुभवास येणारी सामाजिक विषमता, शहरी आणि ग्रामीण परिसरातील राजकारण, मध्यवर्गीय व्यक्तीची अगतिकता हे विषय या कथामधून आलेले आहेत.

अशा प्रकारे समकालीन कथाकारांनी कथालेखनाचे अनेक प्रयोग केले आणि मराठी कथा विकसीत करण्याचा प्रयत्न केला. या दशकातच रवींद्र शोभणे या कथालेखकाचा उदय झाला व त्यांनी आपल्या लेखनातून ठसा उमटवण्याचा प्रयत्न केला. रवींद्र शोभणे आपल्या कथासाहित्यातून ग्रामीण आणि नागर अशा दोन्ही स्तरातील मानवी जीवनाचे चित्रण करतात. त्यांची कथा प्रायोगिक पातळीवरचे नाविन्य दाखवत नसली तरी ती कथा महत्त्वाची मानली जाते व या कथेचे महत्त्व पाहणे गरजेचे वाटते.

दुसऱ्या प्रकरणात रवींद्र शोभणेंच्या कथासंग्रहातील आशयसूत्रे पाहिली. पण त्याआधी शोभणेंचे वाङ्मयीन कर्तृत्व व 'वर्तमान' आणि 'शहामृग' या कथासंग्रहाची वैशिष्ट्ये पाहिली. तर असे दिसून येते की त्यांच्या एकूण पाच कादंबऱ्या व तीन कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांना बरेच पुरस्कारही मिळाले आहेत. शोभणेंनी समीक्षा केली आणि समीक्षेच्याच अंगाने परिपूर्ण ठरेल असा श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास करून स्वत:ला 'डॉक्टरेट' पदवी मिळवून देणारा प्रबंध लिहिला. त्यामुळे डॉ. रवींद्र शोभणे हे नाव मराठी साहित्याला अपरिचित राहिलेले नाही असे दिसते. तसेच त्यांचे कथालेखन उल्लेखनीय झालेले आहे. दोन्ही कथासंग्रहामध्ये व्यक्तित्वाला अधिक महत्त्व दिलेले आहे. 'वर्तमान' हा कथासंग्रह पूर्ण नागरी जीवनाचे चित्रण करतो. तर 'शहामृग' मध्ये नागरी व ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. तसेच वातावरणानुसार नागर तथा ग्रामीण जीवनाचे चित्रण येते व प्रसंगानुरूप भाषाशैलीचा वापर केलेला आहे. कथांच्या आशयामध्ये व आशयसूत्रांमध्ये विविधता दिसून येते.

'वर्तमान' आणि 'शहामृग' या कथासंग्रहातील कथेतील आशयसूत्रे पाहिली. त्यामध्ये कथेतील आशयाचा व घटनाप्रसंगाचा विचार केलेला आहे. सर्व कथांतून राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहार, स्त्री-पुरूष संबंधातील ताणतणाव, वृत्तपत्रीय जगतातील अनीतिमानता, मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृती, समाज सुधारणेतील बेगडीपणा, राजकारणातील सत्तासंघर्षाचे चित्रण ही आशयसूत्रे आलेली दिसतात.

'राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहार' या आशयसूत्राचे चित्रण 'वर्तमान' कथासंग्रहातील 'पायरीचा दगड', 'जल्लोश', 'तेथ लव्हाळे राहती' या कथांमधून आलेले दिसते. 'पायरीचा दगड' या

कथेत बाळासाहेब व सुधीर या दोन्ही कार्यकर्त्यांनी भ्रष्ट व्यवहाराचा उपयोग करून आपल्या समाजाचा नाही तर आपलाच फायदा केलेला दिसतो. 'जल्लोश' या कथेत प्रभू मोवाडकर सारखा विद्यार्थी एका छोट्या निवडणुकीतील भ्रष्ट व्यवहार नाहिसा करायला जातो. तरी सुध्दा उध्दवस्त होतो. 'तेथ लव्हाळे राहती' या कथेत सुदामदादा हे गांधीवादी सच्च्या निष्ठा पाळणारे, भ्रष्ट व्यवहाराला विरोध करणारे दिसतात. तर त्यांचाच विद्यार्थी धैर्यधर त्यांच्या विरूध्द तत्त्वांचा नीतीभ्रष्ट झालेला दिसतो. तो राजकीय जीवनात टिकून राहण्यासाठी कोणताही व्यवहार वापरत असतो.

'स्त्री-पुरुषसंबंधातील ताणतणाव' या आशयसूत्राचे चित्रण 'वर्तमान' या कथासंग्रहातील 'न सापडलेले उत्तर' या कथेमध्ये प्रभा व व्यकटेश परिस्थितीला कंटाळून जवळ येतात पण निर्माण झालेल्या ताणतणावामुळे प्रभा घेतलेला लग्नाचा निर्णय बदलते. 'आपुले मरण' या कथेत वसंतराव व मिसेस जाधव यांची दहा वर्षाची असलेली मैत्री व यामुळे निर्माण झालेले ताणतणाव त्यातच भावनिक पातळीवर आलेला मोहाचा क्षण न टाळू शकल्यामुळे वसंतरावाशी मिसेस जाधव मैत्री तोडून टाकतात. 'इस शहर में हर शख्स...' या कथेत भाईजींच्या बरोबर त्यांच्या मुलीच्या वयाची सुशीला लग्न न करता निष्ठेवर राहते. भाईजींच्या व सुशीलाच्या या संबंधामुळे त्यांना ज्या ताणतणावातून जावे लागते याचे चित्रण येते. 'महाप्रस्थात' या कथेत श्रीधर व नलिनीचे अनअपेक्षितपणे संबंध जुळतात. पण हे नातेसंबंध श्रीधरच्या मृत्यूनंतरही नलिनी टिकवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करते. 'शहामृग' या कथेत आनंदराव पन्नाशीचे प्रतिष्ठित शिकलेले सुज्ञ व्यक्ती असूनही ज्यावेळी वासना, शरीरसुख या गोष्टी येतात तेव्हा फक्त ते 'पुरूष' असतात व आपल्या मुलीच्या वयाची किरण फक्त स्त्री असते.

'वृत्तपत्रीय जगतातील अनीतिमानता' या आशयसूत्राचे चित्रण 'वर्तमान' कथासंग्रहातील 'सत्य' व 'हकनाक' या दोन कथांमधून आलेले दिसते. 'सत्य' या कथेमध्ये निरंजन काकडे सारखे वार्ताहर सुध्दा सत्य माहित असूनही नपुंसक बनलेले दिसतात. 'हकनाक' या कथेत प्रा. झाडगावकर काहीही कारण नसताना वृत्तपत्रातील छापलेल्या बातमीने हैराण होतात. त्यांना खूप मानसिक त्रास सोसावा लागतो. हकनाक अनेक संकटांना तोंड द्यावे लागते.

मानसिक दमनातून निर्माण झालेली विकृती या आशयसूत्राचे चित्रण 'वर्तमान' या कथासंग्रहातील 'केसाळ कातडीचे श्वापद' या कथेमधून आलेले दिसते. या कथेत वेणू जगताप ही

मानसिक विकृती निर्माण झालेली चाळीशी ओलांडलेली अविवाहीता असते. तिच्या वासनानी केसाळ कातडीच्या श्वापदाचे रूप धारण केलेले असते. म्हणून ती विकृत वागत असते.

समाज सुधारणेतील बेगडीपणा या आशयसूत्राचे चित्रण 'शहामृग' या कथासंग्रहातील 'सती आणि महात्मा' या कथेतून आलेले दिसते. या कथेत आचार्य समाज सुधारणेसाठी सुधारणावादाचा प्रयोग कल्याणीला घेऊन करतात. पण कल्याणी त्या प्रयोगातून तावून-सुलाखून निघते. आचार्य मात्र परत सुधारणावादाचा प्रयोग उषाला घेवून करायला निघतात त्यावेळी कल्याणी आचार्यांच्या सुधारणावादी बेगडीपणाच्या विरोधात उभी राहते.

राजकारणातील सत्ता-संघर्ष या आशयसूत्राचे चित्रण 'शहामृग' या कथासंग्रहातील 'खेळीया' या कथेतून आलेले दिसते. या कथेते माईसाहेब, मालविका, शिरूभाऊ या तीन सदस्यांमध्ये नानासाहेबांची संसदेतील रिक्त जागा भरण्यासाठी संघर्ष चालू होतो. या सत्तासंघर्षामध्ये रक्ताची नाती असूनही एकमेकावर आरोप केले जातात व माईसाहेब आपल्याच भाचीवर मालविकावर मारेकरी पाठवतात. भाऊ शिरूभाऊला बदनाम करून स्वत: सत्तेवर येतात.

अशा प्रकारे 'वर्तमान' आणि 'शहामृग' कथासंग्रहातील कथांमधून आशयसूत्रे आलेली दिसतात. तसेच त्यांच्या कथांतून, आशयातून व आशयसूत्रातून विविधता आलेली दिसते.

तिसऱ्या प्रकरणात 'वर्तमान' आणि 'शहामृग' या कथासंग्रहातील कथेतील पात्रांचे परस्परसंबंधाचा शोध घेतला. कथेतील सर्व पात्रे व पात्रांचे परस्परसंबंध पहाताना असे दिसून येते की इतर कथेच्या घटका इतकेच पात्राचे स्थान महत्त्वाचे व अटळ असे आहे. तसेच पात्रांच्या परस्परसंसबंधातून पात्रांचे स्वभाववैशिष्ट्येही दिसून आलीत. शोभणेंच्या कथासंग्रहातील कथेतील पात्रांचे परस्परसंबंध पाहणे सोयिस्कर व्हावे म्हणून त्यांची विभागणी पात्रांच्या परस्परसंबंधानुसार केली आहे.

राजकीय क्षेत्रातील पात्रांचे परस्परसंबंध पहात असताना 'पायरीचा दगड', 'जल्लोश', 'तेथ लव्हाळे राहती', 'खेळीया' या कथेतील पात्रांमध्ये असलेले परस्परसंबंध व अनेक स्वभावाची वैशिष्ट्ये दिसून येतात. सुधीर व बाळासाहेबांचा स्वार्थीपणा, कुरघोडी करण्याची प्रवृत्ती, भाऊंचा साधा सरळ विचार करण्याचा भाबडेपणा मृदुलाचा भोळेपणा, प्रभूचा हट्टीपणा, जिद्दीपणा तर प्राचार्यांचा

'सत्य','हकनाक' या कथातून वृत्तपत्रीय जगतातील पात्रांचे परस्परसंबंधातून वृत्तपत्रीय जगतातील सत्यता कळते. तर सामान्य लोकांवर होणारा अन्याय कळून येतो. निरंजन काकडे-मिसेस भगत यांच्या परस्परसंबंधातून वृत्तपत्रीय जगताची सत्यता दिसते. तर प्रा. झाडगावकर-संपादक, प्रा. झाडगावकर-नवघरे यांच्यातील परस्परसंबंधातून हकनाक सामान्य लोकांवर वृत्तपत्रामुळे होणारा अन्याय दिसतो. तर पात्रांच्या परस्परसंबंधातून कामचुकारपणा निष्काळजीपणा, प्रामाणिकपणा, दुर्लक्षीपणा, भित्रेपणा, लाचारी वृत्ती अशी स्वभाव वैशिष्ट्ये ही दिसून येतात.

'सती आणि महात्मा' या कथेतून सुधारणावादी पात्रांचे परस्परसंबंध चित्रित झालेले आहेत. कल्याणी-नानी, कल्याणी-आई यांच्या परस्परसंबंधातून मित्रत्वाचे, आपलेपणाचे, विश्वासाचे संबंध चित्रित केले आहेत. तर कल्याणी-आचार्य यांच्या संबंधातून सुधारणावादातील बेगडीपणाचे चित्रण केले आहे. तसेच परस्परसंबंध स्वार्थी प्रामाणिक, हेकेखोर, धाडसी, मायाळू, बंडखोर, रानटी, साधी, सरळ, भोळी अशी स्वभाववैशिष्ट्ये दिसून येतात.

अशा प्रकारे 'वर्तमान' व 'शहामृग' या कथासंग्रहातील कथेतील पात्रांचे परस्परसंबंध आलेले दिसतात व परस्परसंबंधातून स्वभाववैशिष्ट्ये दिसून येतात. कथेतील पात्रांचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे समजून येते व शोभणेंनी निर्माण केलेली सर्व पात्रे संघर्षयुक्त आहेत हे कळून येते आणि संघर्षयुक्त पात्रामुळे कथानकाला गती मिळत असते. त्यामुळे शोभणेंच्या कथेतील पात्रामुळे कथेला गती मिळाली आहे. हे लक्षात आल्या वाचून रहान नाही. तसेच कथेतील पात्रांमध्ये राजकीय, वृत्तपत्रीय, सामाजिक अशा विविध क्षेत्रातील पुरूष व स्त्री पात्रे आलेली दिसतात आणि त्या पात्रांच्या स्वभावामध्ये सुध्दा विविधता जाणवते.

राजकीय क्षेत्रातील पात्रांच्या परस्परसंबंधात काही पुरूष पात्रांच्या स्वभावामध्ये स्वार्थीपणा, नीतीभ्रष्टता, हट्टीपणा, जिद्दीपणा, कुरघोडी करण्याची वृत्ती तर काही पात्रे साधी, सरळ, प्रामाणिक, भाबडी, नैतिकतेसाठी लढणारी, स्वाभिमानी दिसून येतात. वृत्तपत्रीय क्षेत्रातील काही पात्रांच्या स्वभावामध्ये कामचुकारपणा निष्काळजीपणा, दुर्लक्षीपणा तर काही पात्रात प्रामाणिकपणा, भित्रेपणा, लाचारी वृत्ती दिसून येते. तसेच समाजसुधारणेच्या क्षेत्रातील पुरूष पात्रांमध्ये स्वार्थीपणा, अधिक दिसून

स्वार्थीपणा व प्रा. काशीकरांचा समंजसपणा, सुदामदादांची नैतिकतेसाठी लढण्याची वृत्ती तर धैर्यधरची नीतीभ्रष्टता, शीलाचा भोळेपणा, प्रमाणिकपणा, विमलची साधी, सरळ व मवाळ वागण्याची सवय तर मालविकाची सत्तेची लालसा, सत्तेत पुढे येण्याची जिद्द तर शेखरचा प्रेमळपणा, माईसाहेबांची खलप्रवृत्ती तर शिरूभाऊंची द्वेषाची भावना व हताशपणा, मालविकाने दाखवलेला विश्वास अशा प्रकारे प्रत्येक व्यक्ती मध्ये वेगवेगळ्या भावना, वृत्ती, प्रवृत्ती आणि स्वभाव दिसून येतात. तसेच प्रत्येक पात्रांच्या परस्परसंबंधातून वेगळेपण जाणवते. काही पात्रांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध दिसून येतात. तर काही संबंधामध्ये द्वेषाची भावना असलेली दिसते व काही संबंधामध्ये लढा सुरू असलेला दिसतो. तर काही संबंध परस्पर विरोधी भूमिकेतून लढताना दिसतात. अशा प्रकारे पात्रांच्या परस्पर संबंधातून शोभणेंनी परस्परविरोधी स्वभावाच्या व्यक्तिरेखांची निर्मिती केलेली दिसते व या व्यक्तिरेखांमुळे कथानकाला एकप्रकारे जिवंतपणा आणलेला दिसतो. राजकीय जीवनात असलेला संघर्ष, खेळी, स्वार्थ, भ्रष्टाचार, कुरघोडी ही सर्व वैशिष्ट्ये पात्रांच्या परस्परसंबंधातून चित्रित केलेली आहेत.

'न सापडलेले उत्तर','आपुले मरण', 'इस शहर में हर शख्स...', 'महाप्रस्थान','शहामृग' या सर्व कथातून स्त्री-पुरूष यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे. त्यात पती-पत्नी, मुलगा-आई-वडील, मुलगी-आई, मुलगी-वडील, प्रियकर-प्रेयसी या संबंधाव्यतिरिक्त विवाह बाह्य स्त्री-पुरूष संबंध आलेले आहेत व स्त्री-पुरूष संबंधातील तणाव, प्रेम, आपुलकी, स्वार्थीपणा, निष्ठा या सर्वांचे चित्रण शोभणेंच्या कथातून दिसून येते. मग त्यामध्ये आनंदराव-सुमती या पती-पत्नी मधील प्रेम विश्वास तर वसंतराव-भावना मधील तणाव येतो. राजू-वसंतराव आणि भावना तसेच प्रभा-लिना या आई वडिल-मुलगा, आई-मुलगी यांच्यासंबंधातील तणाव तर आनंदराव -नीलम या वडिल-मुलगी संबंधातील खुलेपणा, मोकळेपणा चित्रित केला आहे. भाईजी-सुशीला, नलिनी-श्रीधर यांच्या विवाहबाह्य संबंधातील निष्ठा दाखवली आहे. तर आनंदराव-किरण यांच्या संबंधातील वासनेचे चित्रण आले आहे व शैला-प्रभा, सुशीला-विभा यांच्यातील संबंधातून द्वेष, सूड या भावनांचे चित्रण आलेले आहे. या सर्व परस्परसंबंधातून आलेल्या पात्रामधील स्वार्थी, कपटी त्यागी, भोगी, प्रेमळ, प्रामाणिक, व्यवहारीक, लालसीवृत्ती, मानसिक ताण, संघर्ष, तणाव, जिव्हाळ्याची भावना, परकेपणा, द्वेष, सूडाची भावना अशी अनेक स्वभावाची वैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

येतो. प्रत्येक क्षेत्रानुसार पुरूष पात्राच्या स्वभावात बदल झालेला दिसतो त्यामुळे पात्रांच्या स्वभावात विविधता जाणवते.

कथेतील पात्रांच्या परस्परसंबंधातून स्त्री पात्रांच्या स्वभावात सुध्दा वेगळेपणा जाणवतो. राजकीय क्षेत्रातील स्त्री पात्रे ही सत्तेची लालसा असलेली, जिद्दी, खलप्रवृत्तीची दिसून येतात. त्याचप्रमाणे काही स्त्री पात्रे ही भोळी, साधी, सरळ, प्रामाणिक स्वभावाची सुध्दा दिसून येतात. तर समाजसुधारणेच्या क्षेत्रातील स्त्री पात्रे तितकीच धाडसी, बंडखोर स्वभावाची दिसून येतात.

स्त्री-पुरूषातील नातेसंबंधामध्ये पती-पत्नी, मुलगा-आई वडिल, मुलगी-आई, मुलगी-वडिल, प्रियकर-प्रेयसी अशा संबंधा व्यतिरिक्त विवाह बाह्य स्त्रीपुरूष नातेसंबंध आलेले दिसतात.

शोभणेंनी आपल्या कथेतील पात्रांच्या परस्परसंबंधातून राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहार व भ्रष्ट व्यवहाराला करणारी माणसे, भ्रष्ट व्यवहाराने अध्वस्त झालेली माणसे याचे चित्रण केले आहे आणि वृत्तपत्रीय जगतातील चाललेला अंदाधुंदी कारभार व त्यामुळे लोकांचा वृत्तपत्रावरील उडत चाललेला विश्वास तसेच समाजसुधारणेच्या नावाखाली लपून राहिलेला स्वार्थ आणि त्यात नि:स्वर्थी भावाने भरडली जाणारी माणसे त्याचप्रमाणे वेगवेगळ्या स्वरूपात स्त्री-पुरूष नाते संबंधामध्ये वाढत चाललेला तणाव याचेच चित्रण शोभणेंनी जाणिवपूर्वक पात्रांच्या परस्परसंबंधातून केलेला दिसतो.

चौथ्या प्रकरणात 'वर्तमान' व 'शहामृग' या दोन्ही कथासंग्रहातील भाषा आणि निवेदन कसे आले आहे ते पाहिले. त्यात शोभणेंनी वापरलेल्या संवादाच्या भाषेचा निवेदनाच्या भाषेचा विचार केला तर त्यातील वेगळेपण पुढील प्रमाणे आलेले दिसते.

शोभणेंनी आपल्या 'वर्तमान' व 'शहामृग' या दोन्ही कथासंग्रहातून वापरलेली भाषा सहज सुलभ अशीच वाटते. दोन्ही कथासंग्रहातील कथेतून आलेली संवादाची भाषा पात्रानुसार क्षेत्रानुसार बदललेली दिसते व पात्राच्या बोलण्यातून प्रत्येक पात्राचे वेगळेपण जाणवते. शोभणेंनी पुढारी, स्वातंत्र्यसैनिक, प्राध्यापक, वार्ताहर, वेश्या, विकृती निर्माण झालेली महिला, जोगी अशी पात्रे रंगवलेली आहेत. ही सर्व पात्रे आपापल्या आचार, विचार, संस्कृती, वय, विकार, भावना, विकृतीनुसार बोलताना दिसतात. बाळासाहेब हे पुढारी निर्ढावलेले, मुत्सदी असले तरी वेळप्रसंग बघून भाषेचा वापर करताना दिसतात. संपादक वार्ताहरापेक्षा स्तराने मोठा आहे. पण वयाने लहान आहे.

त्यामुळे संपादक वार्ताहराला आदराने बोलावतो. तर वार्ताहर संपादकाला एकेरी बोलावतो. प्रा. काशीकरांची भाषा मोजक्या शब्दात मोठा उपदेश करणारी दिसून येते. तर प्रभूच्या भाषेतून त्याच्या जिद्दी स्वभावाचे दर्शन घडते. सुदामदादा स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी असल्याने त्यांच्या बोलण्यातून दंडुक, ब्रह्मचर्य सारखे शब्द येतात. प्रखर प्रश्नार्थक वाक्ये आलेली दिसतात. तसेच वेश्येच्या भाषेतून तिची बोलण्याची लकब, बोली भाषेचा केलेला वापर लेखकाने योग्य प्रकारे केलेला दिसतो. वेणूची भाषा विकृत स्वभावाचे चित्रण करणारी आहे तर जोगीची भाषा त्याच्या निष्पाप वृत्तीचे चित्रण करणारी आहे त्याचे योग साधनेतील ज्ञान सांगणारी आहे. अशा प्रकारे सर्व पात्रांच्या भाषेत वेगवेगळपणा जाणवतो.

शोभणेंनी भाषा वापरताना पात्राची कथेतील कथेतील गरज बघून हिंदी इंग्रजी भाषेचा वापर केलेला दिसतो. 'जल्लोश' या कथेत हिंदी भाषेचा वापर केलेला आहे. या कथेतील हरीश शुक्लाची मातृभाषा हिंदी आहे. त्यामुळे तो मराठी बोलू शकत नाही. या पात्राची ही गरज ओळखून लेखकाने संवादासाठी हिंदी भाषेचा वापर केलेला दिसतो. तर 'शहामृग' या कथेत इंग्रजी-मराठी मिश्र भाषेचा वापर केलेला आहे. या कथेतील नीलम व आनंदराव यांचा इंग्रजी भाषेशी संपर्क येत असल्यामुळे इंग्रजी भाषेचा दैनंदिन जीवनात वापर करण्याची सवय असते. त्यामुळे लेखकाने संवादासाठी इंग्रजी मराठी मिश्र भाषेचा वापर केलेला दिसतो. तसेच लेखकाने ग्रामीण बोली भाषेचाही वापर गरज बघूनच केलेला आहे. अशिक्षित गावाकडील अशी पात्रे आहेत. त्यांच्यासाठी लेखकाने बोली भाषेचा वापर केलेला आहे.

शोभणेंनी आपल्या 'वर्तमान' व 'शहामृग' या कथासंग्रहातील कथेतून तृतीयपुरूषी निवेदन केलेले दिसून येते व निवेदनासाठी प्रमाण भाषेचा उपयोग केलेला दिसतो. शोभणेंनी निवेदन करताना कथानकाची सुरूवात क्षेत्रानुसार केलेली दिसते. त्यामध्ये 'पायरीचा दगड' या कथेत राजकीय क्षेत्राचे निवेदन आले आहे. म्हणूनच लेखकाने मेळाव्याच्या आयोजनाचे, कार्यकर्त्यांच्या हलचालींचे, पोषाखांचे वर्णन करणारी भाषा वापरली आहे. तर 'सत्य' या कथेत वृत्तपत्रकारीतेचे क्षेत्र निवेदनातून आले आहे. म्हणून इथे लेखकाने भाषेतून टेलिप्रिंटरचा रोल महत्त्वाच्या बातम्या अशा शब्दांचा जाणिवपूर्वक वापर केलेला दिसतो. तसेच 'जल्लोश' या कथेत शैक्षणिक क्षेत्रातील निवेदन आलेले

आहे. लेखकाने इथे कॉलेजच्या निवडणुकीचे वर्णन केले आहे. त्यात कॉलेज मध्ये तास न होणे, हाणामारी होणे, मंत्र्यांनी त्यात सहभाग घेणे वगैरे वर्णन साध्या सरळ भाषेतून केलेले आहे. अशा प्रकारे वेगवेगळ्या क्षेत्रानुसार भाषेचा वापर लेखकाने केलेला दिसतो.

शोभणेंनी निवेदनाच्या माध्यमातून व्यक्तींच्या जीवनाचे मन:स्थितीचे, परिस्थितीचे व व्यक्तिरेखांचे चित्रण केले आहे. निवेदनाची भाषा साधी सरळ वापरलेली आहे. 'महाप्रस्थान' या कथेत लेखकाने जगण्यातील अनुभवानुसार भाषेचा विनियोग केलेला दिसतो. पेपर वाचने ही व्यक्तिच्या जीवनातील महत्त्वाची गरज आहे. लेखकाने सदानंदाच्या पेपर वाचण्याच्या सवयीचे वर्णन भाषेतून केले आहे. तसेच 'न सापडलेले उत्तर' या कथेत प्रभाच्या मन:स्थितीनुसार भाषेचा वापर लेखकाने केलेला आहे. उदा. छताकडे एक टक नजर लावणे, डोळ्यांच्या पापण्या जडावल्यासारखे भासणे, गात्र बधिरल्यागत होणे, निद्रा कुठल्या कुठे नाहीशी होणे, हरवून बसणे असा भाषेचा वापर लेखकाने केलेला आहे. याच प्रमाणे 'पायरीचा दगड' या कथेत सुधीरच्या गरीब परिस्थितीचे निवेदन लेखकाने केले आहे. हे निवेदन करताना सुधीरच्या दारिद्र्याचे चित्रण करणारी भाषा वापरली आहे. जुनाट घर, पडायला आलेल्या भिंती, वडिलांचाा शिवणकामचा व्यवसाय, कपडे कापायला तुटकासा पाट,पत्र्याची खुर्ची, तकलादू संदूक असे घराचे, घरातील वस्तूचे दारिद्र्य दाखवणारे वर्णन भाषेतून केलेले आहे. 'केसाळ कातडीचं श्वापद' या कथेत जोगीची व्यक्तिरेखा लेखकाने रंगवलेली आहे. लेखकाने जोगीच्या बाह्यअंगाची वैशिष्ट्ये लक्षात घेवून भाषेचा उपयोग केलेला दिसतो. उदा. भगवी वस्त्र, मृदंग, दाढी-मिशा, भगवा पटका, पांढरा चंदनी टिळा अशी ठळक वैशिष्ट्ये भाषेतून आलेली आहेत. तसेच 'सती आणि महात्मा' या कथेत आचार्यांची व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. इथे आचार्यांच्या वयाचे वर्णन करणारी भाषा वापरली आहे. उदा. सुरकुतलेला चेहरा, पांढऱ्या शुभ्र मिशा, टक्क ल अशा शब्दांचा वापर करून निवेदन केले आहे.

शोभणेंनी निवेदनातून वातावरण निर्मिती करून कथेला आकार देण्याचा, वास्तवता आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. वातावरण निर्मिती करताना निसर्ग, परिसर वास्तू यांचे चित्रण केलेले आहे. 'सती आणि महात्मा' या कथेत निसर्गातील बदलत्या ऋतुमानाचे चित्रण आले आहे. त्यातून प्रसंग घडणार असल्याचा आभास होतो. त्यासाठी 'काळा करडा ढग ' असा उल्लेख भाषेतून केलेला दिसतो.

त्याचप्रमाणे लेखकाने प्रसंगाला अनुरूप वातावरण निर्मिती करणारी भाषा वापरली आहे. 'सती आणि महात्मा' या कथेत कल्यानी व चंदूच्या मिलनाचा प्रसंग आलेला आहे. या प्रसंगाला अनुरूप वातावरण निर्मिती करण्यासाठी सौंदर्यपूर्ण भाषा लेखकाने लिहिलेली दिसते. 'खेळिया' या कथेत लेखकाने गुढ वातावरण निर्माण होईल अशा भाषेचा उपयोग केलेला दिसतो. बंगल्यातील शांतता चित्रित करणारी भाषा वाचकाच्या मनात भिती निर्माण करणारी आहे. लेखकाने 'खेळिया' या कथेत राजघराण्यातील वास्तूचे चित्रण करण्यासाठी वातावरण निर्मिती केली आहे. यासाठी वास्तूची भव्यता चित्रित होईल अशा भाषेचा वापर केलेला आहे. प्रवेशद्वारावरील 'मातृभूमी' ही अक्षरं, हौदातील कारंजे,पोर्च मधील दोन-तीन गाड्या अशा भाषेत वास्तूचे बारकावे लेखकाने चित्रित केले आहेत.

लेखकाने बारकावे फारसा वापर केलेला नसला तरी जेवढा प्रतिमांचा वापर केलेला आहे. तेवढा कळणाऱ्या भाषेत केलेला आहे. 'हकनाक' या कथेत प्रतिमांचा वापर करताना संस्कृतप्रचूर भाषेचा वापर केलेला आहे. 'खेळिया' या कथेत अलंकार प्रचूर भाषेतून प्रतिमा आलेल्या आहेत. तर 'महाप्रस्थान' या कथेत प्रतिमांचा जो वापर केला आहे. त्याची भाषा रूपकात्मक वापरली आहे. 'इस शहर में हर शख्स...' या कथेत संगीतमय भाषेचा वापर करून प्रतिमांचे चित्रण आले आहे.

शोभणेंनी भाषेतून वाक्यप्रचारांचा फारसा वापर केलेला नाही. दैनंदिन जीवनात वापरले जाणारे वाक्यप्रचार आलेले आहेत. त्यामुळे वाचकाला अर्थ समजून घेण्यात निर्माण होत नाही. त्याच बरोबर लेखकाने कामवासचेही भडक भाषेतून चित्रण केले आहे. वापरलेली भाषा किळस आणणारी असल्यामुळे वाचकाच्या मनात कामवासने विषयी तिरस्कार निर्माण होतो.

अशा प्रकारे शोभणेंनी भाषा आणि निवेदनातून कथा योग्य प्रकारे साकार क रण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

थोडक्यात शोभणेंनी 'वर्तमान' आणि 'शहामृम' या कथासंग्रहातील कथेतून समाजकारण, राजकारण इ. क्षेत्रातील बारकाव्याचे चित्रण कथेमध्ये केलेले आहे. आधुनिक काळामध्ये जगत असताना माणसांच्या मनावर जे वेगवेगळ्या प्रकारचे ताणतणाव येतात त्याचेही सूक्ष्म चित्रण शोभणेंच्या कथेतून आढळते. त्याचप्रमाणे स्त्री-पुरूष नात्यातील परस्परसंबंधाचे अतिशय सूक्ष्म दर्शन कथेतून घडवले आहे. समाजासाठी मनापासून कार्य करू पाहणारी तरूण मुले, जातीय तत्वज्ञानाला आव्हान

देणारीबंडखोर पात्रे रंगवली आहेत व शहरी आणि ग्रामीण परिसरातील पात्रे कथेतून शोभणेंनी घेतली आहेत. भाषा निवेदन, वातावरणनिर्मिती याचा अतिशय चांगला उपयोग कथेतून केला आहे. यादृष्टीने अलिकडे कथा लेखन करणाऱ्यांमध्ये शोभणेंची कथा वेगळी वाटते. शोभणे मराठी कथाकाराच्या इतिहासत स्वत:चे वेगळेपण सिध्द करण्यात यशस्वी झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून भविष्यात ‘वर्तमान’ आणि ‘शहामृग’ पेक्षा सकस कथासंग्रहाची निर्मिती व्हावी अशा अपेक्षा वाढलेल्या आहेत.